ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख १६ मे, १९६२ | अंक १०

## विविध माहिती

**शहराच्या आकर्षणाला बळी पडूं नका**— गुजरात राज्याचें सार्वजनिक बांधकामखात्याचे मंत्री श्री. रतुभाई अदाणी ह्यांनीं विद्यार्थ्यांस उद्देशून बोलतांना असें सांगितलें कीं, विद्यार्थ्यांनीं शहराचें आकर्षण टाळावें. सध्यां राज्यकारभाराचें विकेंद्रीकरण करण्यांत येत आहे अशा वेळीं स्थानिक पुढारी-पणाची फार मोठी गरज आहे. विद्यार्थ्यांनीं खेडेगांवांतील लोकांना मार्गदर्शन करावें.

**निसर्गोपचार पद्धतीचा विकास**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत निसर्गोपचार पद्धतीचा विकास करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. विकास कशा तऱ्हेनें करावा हें सुचविण्यासाठी एक सल्लागार समिती नेमण्यांत आली आहे. ह्या उपचारपद्धतीबाबत संशोधन करण्यासाठी शिफारसी करण्याचें कामहि समिति करील.

**विश्वकिरणांच्या अभ्यासासाठी सहकार्य**—अंतरिक्षांतील विश्वकिरणांचा अभ्यास करण्यासाठी ब्रिटन व अमेरिका या दोन देशांनीं मिळून एक उपग्रह अवकाशांत सोडला आहे. हा उपग्रह १३२ पौंड वजनाचा असून त्याला वरून सोन्याचें पाणी दिलें आहे. उपग्रह पृथ्वीभोंवतीं ९९ मिनिटांत एक प्रदक्षिणा पुरी करील व २०० ते ६०० उंचीवरून भ्रमण करील. तो एक वर्षभर टिकेल.

**प्रत्येक जिल्ह्यांत एक सहकारी गिरणी**—मद्रास राज्याचे उद्योगमंत्री श्री. वेंकटरामन् ह्यांनीं विधिमंडळांत असें जाहीर केलें कीं, मद्रास राज्यांत प्रत्येक जिल्ह्यांत एक सुताची सहकारी गिरणी काढण्याचा सरकारचा विचार आहे. मद्रास राज्यांतील सुताच्या गिरण्यांची संख्या १४६ आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत राज्यासाठी ७५,००० चात्यांना मंजुरी देण्यांत आली आहे.

**ओरिसा राज्यांत शिलकी तांदूळ**—ओरिसा राज्याच्या पश्चिम भागांत गरजेपेक्षा अधिक तांदूळ असून तो शिलकी पडला आहे. ह्यापैकीं बहुतेक तांदूळ हातसडीचा आहे. तांदुळाची किंमत १७रुपये मण आहे. शेजारच्याच आंध्र राज्यांत तांदुळाची किंमत मणामागें ५ ते ६ रुपयांनीं अधिक आहे. परंतु ओरिसा सरकारला आपला तांदूळ पूर्व अन्नविभागाबाहेर विकतां येत नाहीं.

**चीनवर आर्थिक संकटाची छाया**—अमेरिकेचे अतिपूर्व भागाचे सेक्रेटरी मि. ॲव्हरिल हॅरिमन ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, चीनवर मोठ्या आर्थिक संकटाची छाया पडलेली आहे. चीनच्या सरकारनें अन्नधान्याच्या उत्पादन-वाढीच्या ज्या योजना आंखल्या होत्या त्या पूर्णपणें फसल्यामुळें हा बिकट प्रसंग आला आहे.

**अहिंसा विद्यापीठाची स्थापना**—स्वामी सुशिलमणी नांवाच्या एका साधूनें दिल्ली येथें अहिंसा विद्यापीठाची स्थापना करण्याचें ठरविलें आहे. विद्यापीठांत एक संशोधन संस्था आणि शास्त्रीय प्रयोगशाळा खोलण्यांत येणार आहे. सर्व धर्मांच्या अनुयायांनीं एकमेकांच्या धर्ममतांची माहिती करून घेतल्या-शिवाय जगांत शांति नांदणार नाहीं असें स्वामीजींचें मत आहे. अहिंसेच्या तत्त्वावर आधारलेल्या अशा आणखी दोन संस्था असून त्या अनुक्रमें ब्रिटन व जर्मनींत आहेत.

**सर्वांत मोठें औद्योगिक प्रदर्शन**—पश्चिम जर्मनींतील हॅनोव्हर ह्या शहरीं जगांतील सर्वांत मोठें औद्योगिक प्रदर्शन उघडण्यांत आलें आहे. ह्या प्रदर्शनांत २६ देशांतील ५,४३३ कारखानदारांनीं आपआपलीं दालनें उघडलीं आहेत. प्रदर्शन पाहाण्यासाठी २० लाखांपेक्षा अधिक लोक येतील असा अंदाज आहे. निरनिराळ्या देशांतील ३० अधिकृत प्रतिनिधी मंडळेंहि येणार आहेत.

**मॉस्कोमधील संगीत स्पर्धा**—दक्षिण भारतामधील संगी-तज्ज्ञ प्राध्यापक सांबमूर्ती हे मॉस्को येथील आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेसाठी रशियन सरकारच्या आमंत्रणावरून गेले होते. त्यांनीं आपल्या वास्तव्यांत भारतीय संगीताच्या विकासासंबंधीं व वैशिष्ट्यासंबंधीं व्याख्यानें दिलीं. रशियांतील आधुनिक संगीता-विषयीं त्यांनीं समाधान व्यक्त केलें. श्रोत्यांच्या प्रश्नांना त्यांनीं उत्तरेंहि दिलीं.

**दंडकारण्यांतील धरणें**—दंडकारण्यांत मध्यम आकाराचीं पांच धरणें बांधण्याचें काम चालू करण्यांत आलें आहे. सर्व धरणांना मिळून सुमारें ५·५ कोटी रुपये खर्च येणार असून तीं पुरीं झाल्यावर सुमारें १ लाख एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होऊं लागेल. दंडकारण्य वसाहतीचा अहवाल लोकसभेच्या सभा-सदांना देण्यांत आला. त्यांत वरील माहिती देण्यांत आली आहे. ह्या वसाहतीसाठी मध्यप्रदेश व ओरिसा राज्य सरकारांनीं १·५ लाख एकर जमीन उपलब्ध करून दिली.

**स्टालिनच्या कारकीर्दींतील बळी**—रशिआंतील 'प्रवदा' ह्या वृत्तपत्राचा ५० वा वर्षदिन रशिआंतील लेखकांच्या संघातर्फे साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं 'प्रवदा' वृत्तपत्रांत काम केलेल्या दोघा पत्रकारांना श्रद्धांजली वाहण्यांत आली. ह्या कामीं प्रसिद्ध रशिअन लेखक मि. एल्हेनबर्ग ह्यांनीं पुढाकार घेतला होता. उपरोक्त पत्रकारांचा स्टालिनच्या राजवटींत खून करण्यांत आलेला आहे.

## गोमंतकांतील सद्यःस्थिति

### स्वराज्याचा भलताच अर्थ करणाऱ्यांचा बेजबाबदारीचा प्रचार

लेखकः- निरीक्षक

गोमंतक स्वतंत्र झाला. त्या आनंदाच्या भरांत सभांचा आणि व्याख्यानांचा प्रत्यहिं पाऊस पडला. जबाबदार वक्ते जबाबदारीनेंच बोलले; पण कांहीं सभांतून बेजबाबदारांनीं जुने अधिकारी, व्यापारी व जमीनदार यांच्यावर भलतेंच तोंडसुख घेतलें ! बरें तेथें वाईटहि असतें आणि वाईटांतूनहि बरें निघत नाहीं असें नाहीं. जुन्या अधिकाऱ्यांत, व्यापाऱ्यांत किंवा जमीनदारांत कांहीं व्यक्ति वाईट निघाल्या म्हणून ते वर्गच वाईट म्हणणें आणि ओलें-सुकें बरोबर जाळण्याचा प्रयत्न करणें मुळींच योग्य नव्हे.

आजपर्यंत गोमंतकांत ज्या चळवळी झाल्या, शाळा–वाचनालयांसारख्या ज्या सार्वजनिक संस्था काम करूं लागल्या, किंवा गरीब–अनाथांनाहि ज्या कठीण परिस्थितीला तोंड देतां आलें, त्या सर्वांना गोमंतकीय व्यापारीवर्गाकडून साहाय्य झालें आहे हें नाकबूल करून चालणार नाहीं. ज्या वेळीं तांदूळ न मिळाल्यानें अन्नान्नदशा आली त्या वेळीं जमीनदारवर्गाकडून कित्येकांना भाताच्या रूपानें थोडेंथोडकें का होईना साहाय्य झालेलें त्यांच्या स्मरणांत असेल. कित्येक कुळांनीं तर मदत म्हणून घेतलीच; पण खंडाची बाकी देखील दिली नसल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. पोर्तुगीजांच्या जुलमी कायद्याप्रमाणें वागावें लागलें तरी अनेक सज्जन अधिकाऱ्यांनीं भीत भीत का होईना, गुप्तपणें सहानुभूति दाखविली नाहीं असें नाहीं. यासाठी बोलतांना किंवा लिहितांना वस्तुस्थितीचा पुरेपूर अभ्यास न करतां एखाद्या वर्गावर तोंडसुख घेऊन वर्गांत व पर्यायानें समाजांत अस्वास्थ्य माजविण्यास कारणीभूत होणें ठीक नाहीं. काळेबाजारवाले जगांत सर्वत्र आहेत. टीका करणाऱ्या आमच्यांत तरी ते नाहींत असें छातीठोकपणें आम्हीं तरी सांगूं शकूं का ?

मनुष्याची योग्य पारख करून त्याचा समाजकार्यीं उपयोग करून घेण्यासाठी कोणती योजना आंखावी हें पाहाण्याचा आजचा काल आहे. काळा बाजार करून ज्यांनीं पैसा मिळवला त्या पैशांतील जास्तींत जास्त भाग कुशलतेनें कसा घ्यावा व त्याचा समाजकार्यीं प्रामाणिकपणें विनियोग करून देणाराला व जनतेला कसें समाधान प्राप्त करून द्यावें, अशा योजनेच्या योजकांची आज गरज आहे.

परिस्थितींत स्थित्यंतरें होतात, तसेंच मानवी मनांतहि वैचारिक बदल घडतात. ते इष्ट दिशेनें घडले कीं मानसिक परिवर्तन झालेंच. अशा रीतीनें विचारांत क्रांति झाल्यावांचून काळाबाजार बंद होणें शक्य नाहीं. आयात-निर्गत मालाचाच काळाबाजार होतो असें नाहीं; तर इथल्या इथेंहि जे अनेक आडमार्गी व्यवहार होतात तेहि त्याच सदरांतील आहेत.

कांहीं सभांतून बेजबाबदार वक्त्यांनीं स्वातंत्र्याचा भलताच अर्थ करून दिल्यानें अशिक्षित लोकांत बराच गैरसमज पसरलेला आहे. त्यामुळें कित्येक ' आतां कर देण्याचा नाहीं. ' असें म्हणतात तर कांहीं शेतमालकास खंड देण्याचें नाकारतात. दुकानांतून जिन्नस घेऊन पैसे देण्याच्या वेळीं 'स्वराज्यांत पैसे कसले ?' असें कोणी म्हणतात, तर कोणी अंमली पेय ढोसून शिवीगाळीहि करतात !

नागरिकांनीं अधिकाऱ्यांच्या सौजन्याचा दुरुपयोग अराजक करून अस्वास्थ्य माजविण्याचा प्रयत्न करणें घातक आहे. गडबड करून कायदा हातांत घेण्यापर्यंतच्या गोष्टी बोलणें ठीक नव्हे !

—भारतमित्र, रिवण (गोवा) एप्रिल, १९६२

## तिसऱ्या योजनेंत ९ लाख रेडिओंचें उत्पादन

रेडिओ सेटसूच्या उत्पादनांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत तिपटीहून अधिक वाढ झाली असून तिसऱ्या योजनेच्या काळांत त्यांत आणखी तिपटीनें वाढ होणार आहे. सन १९५५-५६ मध्यें सुमारें १ लाख रेडिओ तयार झाले होते. १९६०-६१ मध्यें हा आंकडा ३·२ लक्षांवर गेला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सुमारें ९ लक्ष रेडिओ सेटसूचें उत्पादन होईल अशी अपेक्षा आहे. यापैकी मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांत ८ लक्ष व छोट्या कारखान्यांत १ लक्ष रेडिओ तयार होतील.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीला रेडिओ सेटस् तयार करणारे १५ कारखाने किंवा कंपन्या होत्या आणि त्यांची प्रस्थापित उत्पादनशक्ति २,११,८०० रेडिओ सेटस् होती. १९६०–६१ मध्यें त्यांत वाढ होऊन कारखान्यांची संख्या २० वर व प्रस्थापित उत्पादनशक्ति २,७९,१८० रेडिओ सेटसूवर गेली. या २० कारखान्यांपैकीं ७ कारखाने महाराष्ट्रांत, ५ प. बंगालमध्यें, ३ पंजाबांत, २ मद्रास राज्यांत आणि बिहार, दिल्ली व म्हैसूर राज्यांत प्रत्येकी एक कारखाना आहे.

त्याशिवाय छोटे उद्योगधंदे क्षेत्रांत रेडिओ सेटसूची जुळणी करणारे सुमारें २०० छोटे कारखाने किंवा कंपन्या असून त्यांची एकूण वार्षिक उत्पादनशक्ति ६५,००० रेडिओ सेटसूची आहे. १९६०–६१ मध्यें या छोट्या कंपन्यांनीं ४०,००० रेडिओ तयार केले.

अलीकडे ट्रॅन्झिस्टर रेडिओसाठी मागणी वाढली असून रेडिओ तयार करणारे कारखाने आपल्या नेहमींच्या उत्पादनकार्यक्रमाखेरीज ट्रॅन्झिस्टर रेडिओ तयार करून ही मागणी पुरी करीत आहेत.

### स्वस्त किंमतीचे रेडिओ

स्वस्त म्हणजे १२५ रु. किंवा त्याहून कमी किंमतीच्या रेडिओचें उत्पादन ही रेडिओ उत्पादनधंद्यांतील अलीकडील एक विशेष घटना म्हणतां येईल. रेडिओच्या परवान्यांकरितां जी फी भरावी लागते त्याच्या निम्मी फी ह्या स्वस्त किंमतीच्या रेडिओसाठी सरकारनें ठेवली आहे. सध्यां भारतांत प्रतिवर्षीं अशा प्रकारचे ५०,००० रेडिओ तयार होतात.

रेडिओचे सुटे भाग देशांतच तयार करण्याच्या बाबतींत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत बरीच प्रगति झाली. रेडिओ व्हॉल्व्हचें उत्पादन भारत इलेक्ट्रॉनिक्स लि. कंपनी करीत असून १९६२–६३ पासून ही कंपनी दरवर्षी १८ लक्ष व्हॉल्व्हज तयार करील.

संपूर्ण रेडिओ सेटसूच्या आयातीवर संपूर्ण बंदी घातल्याला आतां बरीच वर्षे झालीं असून भारतांत तयार न होणाऱ्या सुट्या भागांचीच फक्त परदेशांतून आयात करण्यांत येते.

भारतांतून निर्यात होणाऱ्या विशेषतः-पश्चिम आशियाई देशांकडे रेडिओच्या संख्येंतहि अजूनहि पाहिजे तशी वाढ झालेली नाहीं. १९६०–६१ मध्यें सुमारें १ लक्ष रुपये किंमतीच्या रेडिओची परदेशांत निर्यात झाली.

---

### पलाई बँकेच्या ठेवीदारांचें डिव्हिडंड

पलाई सेंट्रल बँकेच्या ठेवीदारांना रुपयांतले ४० न. पैसे देण्यांत आले. आणखी रक्कम देण्यास पुरेसे पैसे नाहींत, असें लोकसभेंत सरकारतर्फें सांगण्यांत आलें. ऑफिशिअल लिक्विडेटरनें जंगम मालमत्ता विकून २,९१,७३,४९९ रु. जमा केले आणि स्थावरच्या विक्रींतून १३,८८,०७२ रु. मिळाले.

# अर्थ

बुधवार, ता. १६ मे, १९६२





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## अंदाजपत्रकांतील कर कमी करण्याची सूचना

ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज, मुंबई, ह्या संघटनेच्या कार्यकारी मंडळानें भारत सरकारच्या अंदाजपत्रकांत सुचविण्यांत आलेल्या कांहीं करांत कपात करावी अशी सूचना केली आहे. ह्यासंबंधीं संघटनेतर्फे सादर करण्यांत आलेल्या निवेदनांत असें म्हटलें आहे कीं, कराची पातळी कांहीं विशिष्ट मर्यादेच्या पुढें गेली तर त्याचे अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असते. ही मर्यादा ओलांडली गेली तर वस्तूंच्या किंमतींचें स्थैर्य बिघडून जाईल, इतकेंच नव्हे तर उद्योगधंद्यांच्या उत्पादनाच्या खर्चांतहि वाढ होईल. आर्थिक विकासाचें काम मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी योग्य अशा धोरणाचा पाठपुरावा करण्यांत आला पाहिजे. बचत आणि पैशाची गुंतवणूक ह्यांना उत्तेजन देण्याचें कार्य सरकारी धोरणानें साधलें पाहिजे. पण अंदाजपत्रकांत ज्या जादा करांची तरतूद करण्यांत आली आहे त्याचा परिणाम असा होणारा नाहीं. लोकांच्या जवळील शिलकी पैसा शोषून घेण्याचें काम मात्र नव्या करांच्या मुळें होईल. त्यामुळें खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांत पैसे गुंतविण्यावर विपरीत परिणाम होईल. अर्थमंत्र्यांनीं अशी सूचना केली आहे कीं खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांनीं साधारण भागभांडवल काढून आपल्याला लागणाऱ्या भांडवलापैकीं बराच मोठा भाग उभारावा. भांडवलासाठी त्यांनीं बँकांवर फारसें अवलंबून राहूं नये. अर्थमंत्र्यांनीं केलेली ही सूचना व अंदाजपत्रकांत त्यांनीं सुचविलेली करपद्धति ह्यांची सांगड घालणें कसें शक्य आहे, तें समजणें कठीण आहे. अंदाजपत्रकांत कॉर्पोरेशन करांत वाढ सुचविण्यांत आलेली आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील उद्दिष्टें गांठण्यासाठी खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना अधिक भांडवलाची गरज आहे. उद्योगधंद्यांना होणारा नफा परत भांडवलाच्या रूपानें गुंतवूनच कार्यक्रमांतील उद्दिष्टें गांठतां येणें शक्य होणार आहे. परंतु कॉर्पोरेशन करांत वाढ झाल्यामुळें नफ्यांतून नवें भांडवल निर्माण होऊं शकणार नाहीं. व्यक्तीवरील प्राप्तीकरांतहि वाढ करण्यांत आलेली आहे. ह्या वाढीमुळें मध्यम वर्गांतील कर भरणाऱ्या माणसाला चांगलाच तडाखा बसणार आहे. ह्या वर्गाला बचत करण्याची व केलेली बचत गुंतविण्याची इच्छा असते. परंतु करांचें ओझें वाढल्यामुळें ह्या वर्गामधून भांडवलाचा संचय होण्याची क्रिया थांबण्याचा संभव आहे; किमानपक्षी त्या क्रियेची गति मंद तर होईलच होईल असा अंदाज आहे. अंदाजपत्रकांत सुचविण्यांत आलेले अप्रत्यक्ष करहि उद्योगधंद्यांना जाचक ठरणारे आहेत. लोखंड, पोलाद, कांहीं प्राथमिक रसायनें, विजेच्या तारा, इत्यादींवर अबकारी कर बसविण्यांत आला आहे. परंतु अशा प्रकारचा माल हा कच्च्या मालांत मोडतो. कच्च्या मालाशीं सदृश असलेला अशा प्रकारचा माल आणि अर्धसंस्कारित पक्का माल ह्यांच्यावरील कर योग्य म्हणतां येणार नाहींत. कारण अशा करांमुळें उद्योगधंद्यांच्या विकासांत अडचणी निर्माण होतात. कापडधंद्यांवर जो वाढता अबकारी कर घेण्याचें सुचविलें आहे त्यामुळें ह्या धंद्याच्या विकासाला मर्यादा पडतील. कच्चा माल व अर्धसंस्कारित माल ह्यांच्यावरील अबकारी करांत एकवट सूट देण्याची सूचना स्वागतार्ह आहे. परंतु सूट देण्याची योजना सोपी आणि सहज अंमलांत आणण्यासारखी असावी.

## बँका आणि औद्योगिक कर्जपुरवठा

सरकारी पंचवार्षिक योजनांचा आणि हिंदी बँकिंगचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे, हें लक्षांत घेऊन अर्थमंत्री श्री. मुरारजी देसाई ह्यांनीं अंदाजपत्रक लोकसभेला सादर केल्यानंतर प्रमुख बँकर्सची एक अनौपचारिक बैठक बोलावली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत बँकांनीं दिलेल्या कर्जांत ४५५ कोटी रुपयांची वाढ झाली, त्यांपैकी ३४० कोटी रुपयांची वाढ औद्योगिक कर्जांत झाली. म्हणजे, एकूण कर्जांतील औद्योगिक कर्जांचें प्रमाण ३२% चें ५१% झालें. सहाजीकच, बँकांच्या सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीवर त्याचा अनिष्ट परिणाम झाला. शेड्युल्ड बँकांच्या ठेवी १,८२७ कोटी रु. वरून १,९८२ कोटी रुपयांवर गेल्या, पण सरकारी रोख्यांतील त्यांची गुंतवणूक ७८७ कोटी रुपयांवरून ५७९ कोटी रुपयांवर आली. म्हणजे, ठेवींशीं ह्या गुंतवणुकीचें प्रमाण ४३% चें २९% वर उतरलें. सरकारला तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ८०० कोटी रुपये कर्जरूपानें उभारावयाचे आहेत; सहाजिकच ही परिस्थिति अशा कर्जउभारणीच्या यशाला पोषक नाहीं. उद्योगधंदे वाढत आहेत, त्यांना पुरेसा कर्जपुरवठा करणेंहि बँकांना शक्य होणार नाहीं. कारखान्यांनीं बँकांवरील आपलें अवलंबन कमी करून त्यांनीं ह्यापुढें स्वतःच आपले पैसे उभारले पाहिजेत. बँकांच्या ठेवींमधील वाढीच्या मानानें कर्जांची वाढ द्रुतगतीनें होत आहे. कांहीं वर्षांपूर्वीं कर्जांचें ठेवींशीं प्रमाण ५०% होतें तें ७०% पर्यंत पोंचलें आहे. भांडवलाची टंचाई आणि बचतीच्या मर्यादा, ह्यांच्यामुळें बँकांकडील ठेवींत पुरेशी वाढ होणें अशक्य आहे. उद्योगधंद्यांना दिलेलीं कर्जे विशेष किफायतशीर असतात; तीं कमी करून कर्जरोखे घेण्यास बँका तयार होणार नाहींत. बँकेकडून कर्जाचा अर्ज मंजूर करून घेण्याइतकें नवीन भांडवल बाजारांत उभारणें सोपें नाहीं; उत्पादनवाढीबरोबर खेळतें भांडवलहि जास्त लागतें आणि तें पुरविणें हा तर बँकांचा मुख्य धंदा आहे.

### अमेरिकेंतील टेलिव्हिजनचा प्रसार

जानेवारी, १९६२ मध्यें अमेरिकेंतील प्रत्येक दहा घरांपैकीं नऊ घरांत टेलिव्हिजन सेट होता. प्रत्येक आठ घरांपैकीं एका घरांत दोन किंवा दोनपेक्षा अधिक सेट्स होते.

### दुधासाठीं १६ मैल प्लॅस्टिकचे नळ

युगोस्लाव्हियांतील नोव्हा जॉर्शिया ह्या डोंगराळ भागांतून टॉलमिन येथील डेअरींत दररोज दूध आणण्यासाठी १६ मैल लांबीचे प्लॅस्टिकचे नळ टाकण्यांत आले आहेत.

### गलिच्छ वस्त्यांच्या उच्चाटनाचा प्रश्न

मोठ्या शहरांतील गलिच्छ वस्त्या नाहींशा करण्यासाठी गेल्या कांहीं वर्षांत प्रयत्न होऊं लागले आहेत. ह्या कामीं स्थानिक स्वराज्य संस्था, राज्यसरकारें आणि मध्यवर्ती सरकार आपआपल्या परीनें झटत आहेत. तरीसुद्धां हा प्रश्न सोडविण्याच्या कामीं फारसें यश आल्याचें दिसत नाहीं. गलिच्छ वस्त्या सुधारण्याच्या कामीं किती पैसा खर्च झाला ह्या निकषावर प्रश्न सोडविण्यांतील यशापयश मोजून चालणार नाहीं. कारण शहरांतील एखादी गलिच्छ वस्ती उठविण्यांत आली तर दुसरीकडे ती उद्भुत झाल्याचें पुष्कळदा आढळून येतें. ह्या बाबतींत कलकत्ता, दिल्ली, मुंबई ह्यासारख्या मोठ्या शहरांतील अनुभव लक्षांत घेण्यासारखा आहे. कलकत्ता शहरांतील गलिच्छ वस्त्या नाहींशा करण्यासाठी २ कोटी रुपये खर्चाची योजना आंखण्यांत आली आहे. परंतु प्रत्यक्ष परिणाम घडून येण्याच्या दृष्टीनें ही योजना अतिशय अपुरी आहे. शहरांतील सर्व गलिच्छ वस्त्या नाहींशा करावयाच्या झाल्या तर ७ लक्ष लोकांना राहण्याच्या जागा पुरवाव्या लागतील आणि त्यासाठी १०० कोट रुपये खर्च येईल. दिल्ली शहरांतील गलिच्छ वस्त्या उठविण्यासाठींहि ४ कोटी रुपये खर्च येणारी योजना आखण्यांत आली आहे. परंतु गेल्या कांहीं वर्षांत घाणेरड्या जागांतून राहाणाऱ्या लोकांची दिल्लीमधील संख्या ३५,००० वरून ६५,००० पर्यंत वाढलेली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत महाराष्ट्र सरकारनें ह्या कामासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. गलिच्छ वस्त्या उत्पन्न होण्याचीं अनेक कारणें आहेत. त्यांचें निर्मूलन केल्या खेरीज हा प्रश्न सुटण्याची शक्यता दिसत नाहीं. ह्या कारणांत खेड्यांतील लोकांचा शहराकडे येत असलेला मोठा लोंढा हेंहि एक महत्त्वाचें कारण आहे.

---

### भारतामधील तांब्याचें उत्पादन वाढलें पाहिजे

भारताला लागणारें सर्व तांबें तो निर्माण करूं शकत नाहीं. उलट, देशाच्या गरजा व देशांतर्गत उत्पादन ह्यांतील तफावत वाढतच चाललेली आहे. देशांतील तांब्याची गरज एकसारखी वाढत चालली आहे. १९६० सालीं भारतानें तांब्याच्या आयातीवर २४ कोटी रुपये खर्च केले. त्याच्या मागील वर्षी तांबें, शिसें आणि जस्त ह्या खनिजांच्या आयातीवर १·५ कोटी रुपये अधिकच खर्च झाले होते. ह्यावरून तांब्याच्या खाणींचा शोध करून त्याचें उत्पादन वाढविण्याचें महत्त्व लक्षांत येईल. देशाच्या विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेंत तांब्याला फार महत्त्वाचें स्थान आहे. त्याचा तुटवडा पडला तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील अनेक मोठीं कामें अडून राहाण्याची शक्यता आहे. राजस्थान आणि सिकिम ह्या भागांत तांब्याच्या बऱ्याच मोठ्या खाणी असल्याचें सिद्ध झालें आहे. परंतु ह्या खाणी उत्पादनाच्या कक्षेंत आणण्याचें काम अजून व्हावयाचें असून तें बरेंच खर्चाचेंहि आहे. खाणींतून उत्पादन सुरू झालें तरी त्याचा उत्पादनाचा खर्च परवडेल किंवा नाहीं हाहि एक अवघड प्रश्न आहे. ह्या दृष्टीनें तांब्याच्या उत्पादनांत परदेशांत होणाऱ्या घडामोडींकडे लक्ष देणें अगत्याचें आहे. अलीकडे इटली व अमेरिका ह्यामधील कांहीं खाणमालकांनीं आपली नजर आफ्रिकेवर वळविली आहे. सूडानमधील तांब्याच्या खाणींचा शोध लावण्याची परवानगी सूडानच्या सरकारकडून त्यांनीं मिळविली आहे. सुमारें ५०,००० चौरस मैलांत संशोधन करण्याचें काम हें खाणमालक करणार आहेत. दक्षिण -होडेशियांतील तांब्याच्या खाणींचा विस्तार करण्याचें काम दुसरी एक कंपनी हातीं घेणार आहे.

### भागदारांचें मत प्रभावी कसें होईल?

अमेरिकेंतील कंपन्यांच्या वार्षिक सभांचे वेळेची भागीदारांची उपस्थिति वाढत चालली आहे. ह्याचें बरेंचसें श्रेय लुई डी. गिल्बर्ट आणि जॉन डो. गिल्बर्ट ह्या दोघां भावांना आहे. गेलीं ३० वर्षे त्यांनीं भागीदारांमध्यें जागृति निर्माण करण्याचें कार्य अखंड चालविलें आहे. त्यांचा १९६१ विषयक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. गिल्बर्ट बंधू आणि त्यांचे सहाय्यक दरवर्षी सुमारें २०० कंपन्यांच्या सभांना हजर राहातात. भागदारांच्या मताला महत्त्व मिळवून देण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असतो. गिल्बर्ट बंधूंचीं उद्दिष्टें येथें थोडक्यांत दिलीं आहेत.

(१) कायद्यानें भागदारांना दिलेल्या संधीचा फायदा घेऊन वार्षिक सभेंत संचालकांना प्रश्न विचारणें.

(२) सोयीस्कर ठिकाणीं वार्षिक सभा भरविल्या जाव्यात, असा आग्रह धरणें.

(३) वार्षिक अहवालांत जास्त माहिती दिली जावी आणि सभेचे तपशीलवार वृत्तांत भागदारांकडे पाठविले जावें, असा प्रयत्न करणें.

(४) सर्व संचालक स्वत: भाग धारण करणारे असावे; त्यांचे प्रत्येकाचे किमान १०० भाग असावे, असें प्रतिपादून घडवून आणणें.

(५) अधिकारीवर्गाला योग्य भरपाई, पेन्शन, इत्यादि मिळतें का, इकडे लक्ष ठेवणें.

(६) संचालकांच्या निवडणुकी क्युम्युलेटिव्ह पद्धतीनें व्हाव्यात असा प्रयत्न करणें; त्यामुळें स्वतंत्र संचालकांना निवडून येणें शक्य होतें.

(७) भागदारांचें मत व्यक्त करणारे ठराव वार्षिक सभेंत मांडणें.

---

### तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील यंत्रसामग्रीची आयात

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत आयात कराव्या लागणाऱ्या यंत्रसामग्रीसाठी व इतर साधनांसाठी किती परदेशीय चलन लागेल ह्याचा अंदाज भारत सरकारच्या अर्थखात्यानें केला आहे. ह्या अंदाजाप्रमाणें सुमारें २,५०० कोटी रुपयांचें परदेशीय चलन लागणार आहे. १९६० सालीं तिसऱ्या कार्यक्रमाचा कच्चा मसुदा तयार करण्यांत आला होता. त्या वेळीं कार्यक्रमांतील योजनांसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाचा अंदाज १,९०० कोटी रुपयांपर्यंत करण्यांत आला होता. गेल्या वर्षाच्या आरंभीं परदेशी चलनाचा गरजेचा पुन्हा एकदा आढावा घेण्यांत आला होता. त्या वेळीं २,०३० कोटी रुपयांचें परदेशीय चलन लागेल असा हिशेब होता. प्रत्येक नवा अंदाज हा अधिकाधिक रकमेचा झाला आहे. भारताला मदत करणाऱ्या राष्ट्रांची जी संघटना आहे तिची बैठक पुढील महिन्यांत भरणार आहे. त्या वेळीं मदत करणाऱ्या राष्ट्रांना भारताच्या गरजांची कल्पना देणें आवश्यक ठरणार आहे. म्हणून जागतिक बँकेचे प्रतिनिधी भारत सरकारच्या निरनिराळ्या खात्यांच्या गरजांचा अभ्यास करून गेले. अर्थखात्यानें परदेशीय चलनाच्या गरजेचा जो ताजा अंदाज केला आहे तो वरील अभ्यासावर आधारलेला आहे. अंदाजांत जी वाढ दिसून येते त्याला कांहीं कारणें आहेत. एकतर आयात करण्यांत यावयाच्या मालाची किंमत कांहींशी वाढली आहे. दुसरें असें कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या वर्षांतील कांहीं कामें खात्यांनीं पार पाडलेलीं आहेत. त्यामुळें उरलेल्या काळांतील गरजांचा हिशेब त्यांना अधिक बिनचूकपणें करतां आलेला आहे. कार्यक्रमांतील कामें पार पाडण्याच्या कामीं परदेशीय चलन कमी पडूं लागलें तर अधिक मदत देण्याची तयारी दाखविण्यांत आली आहे.

### मच्छीमारीच्या धंद्यासाठीं जपानची मदत

भारतामधील निरनिराळ्या राज्यांनीं मच्छीमारीच्या धंद्याचा विकास करण्यासाठीं आधुनिक साधनांचा वापर करण्याच्या योजना आंखल्या आहेत. परंतु ह्या कामासाठीं लागणाऱ्या यंत्रचलित बोटी कमी पडत आहेत. बोटींसाठीं लागणारीं २५० ते ३०० सागरी एंजिनें आयात करण्यांत येणार आहेत. जपाननें भारताला जें कर्ज दिलेलें आहे, त्यामधून एंजिनांची किंमत चुकती करण्यांत येईल. एंजिनें आयात करण्यासाठीं ३० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. एंजिनांची किंमत त्यांच्या अश्वशक्तीप्रमाणें ७,००० ते २०,००० रुपयांपर्यंत आहे. निरनिराळ्या राज्यांना किती एंजिनें द्यावयाचीं तें अद्याप ठरलेलें नाहीं. आयात करण्याची कामगिरी स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनमार्फत करण्यांत येईल.

### गुजरात राज्यांत नारळीची लागवड

मध्यवर्ती नारळ संशोधन केंद्राचे चालक डॉ. मेनन ह्यांनीं गुजरात राज्याचा १७ दिवसांचा दौरा पूर्ण केला आहे. गुजरातच्या १ हजार मैल लांबीच्या किनाऱ्यालगत नारळी व पोफळी ह्यांची लागवड होण्यासारखी आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. मात्र त्यासाठीं सध्या हातीं असलेलीं पाणी-पुरवठ्याचीं कामें पूर्ण होण्याची आवश्यकता आहे. कारण, राज्यांतील किनाऱ्याजवळ असणारी कांहीं जमीन समुद्राच्या पाण्यानें खारी झालेली आहे. भारताला आपल्या नारळाच्या व सुपारीच्या गरजेपैकी एक तृतीयांश गरज आयात करून भागवावी लागते. गुजरातची जमीन व हवा नारळाच्या लागवडीला योग्य असल्यानें लागवड झाल्यास भारताची सर्व गरज देशांतील उत्पादनच भागवूं शकेल.

### भारतांत लक्षाधीशांची संख्या वाढली

म्हैसूर प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. निजलिंगप्पा हे पं. नेहरूंना नुकतेच भेटले. त्या वेळीं त्यांनीं पं. नेहरूंच्याजवळ स्वर्गीय डॉ. विश्वेश्वर अय्या ह्यांचें स्मारक करण्याचा मनोदय बोलून दाखविला व ह्या कामासाठीं २० लाख रुपये जमविण्याचा आपला हेतु असल्याचें सांगितलें. परंतु इतकी मोठी रक्कम जमविण्याच्या कामीं बऱ्याच अडचणी असल्याचेंहि त्यांनीं बोलून दाखविलें. त्यावर पं. नेहरूंनीं त्यांना ह्या बाबतींत चिंता करण्याचें कारण नाहीं असें सांगितलें. पं. नेहरू ह्यांच्या मतानें भारतामधील लक्षाधीशांची संख्या गेल्या कांहीं वर्षांत वाढली असून पूर्वी कधींहि नव्हते इतके लक्षाधीश आज भारतांत आहेत. त्यांच्या पाठिंब्यानें २० लाखांची रक्कम जमा करणें सहज शक्य होईल, असा पं. नेहरूंचा अभिप्राय आहे.

### जनता सहकारी बँकेची भोर शाखा

जनता सहकारी बँकेच्या भोर शाखेचा उद्घाटन-समारंभ रविवार, दि. ६ रोजीं सकाळीं सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार, श्री. बोंगिरवार ह्यांच्या हस्तें झाला. श्री. पाटणकर वकील ह्यांच्या वाड्यांत शाखेची कचेरी असून श्री. के. ह. मराठे हे शाखेचे एजंट आहेत.

### नासिक जि. मध्यवर्ती बँकेची ओझर (तांबट) शाखा

नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ओझर (तांबट) शाखेचें उद्घाटन गुरुवार, दि. १७ मे रोजीं सहकार उप-मंत्री ना. सताळ ह्यांच्या हस्तें होणार आहे.

**दूध निर्जंतुक करण्याचा कारखाना**—सुरत जिल्ह्यांत बारडोली ह्या ठिकाणीं एका गौळवाड्याची स्थापना करण्यांत येणार आहे. गौळवाड्यांत दूध निर्जंतुक करण्यासाठीं यंत्रसामग्री बसविण्यांत येणार असून तिची किंमत ५ लाख रुपये असेल. ही योजना बारडोली साखर कारखान्यानें पुरस्कृत केलेली असून तिला लागणाऱ्या भांडवलापैकीं ५० टक्के भांडवल साखर कारखाना पुरविणार आहे.

**गुजरातमधील नवी गोशाळा**—मेहसाण्यापासून ३५ मैलांवर असलेल्या अमरापूर ह्या ठिकाणीं चांगल्या प्रतीच्या गाई पैदास करण्याचें केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. गोशाळा स्थापन करण्यासाठीं स्वित्झरलंडमधील कांहीं जिल्ह्यांनीं मदत पाठविली आहे. केंद्र उभारण्यासाठीं १,९०,००० रुपये खर्च येणार आहे. केंद्रांत एक माध्यमिक शाळा उघडण्यांत येईल.

**आर्ट सिल्कवरील कर रद्द करा**—आर्ट सिल्क वापरून बनविण्यांत येणाऱ्या कापडावरील कर संपूर्णपणें रद्द करण्यांत यावा अशी मागणी सुरत चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे करण्यांत आली आहे. भारत सरकारच्या अंदाजपत्रकांत जे नवे कर बसविण्यांत आले आहेत त्यामुळें ह्या धंद्यावर अतिशय वाईट परिणाम होईल असें चेंबरचें म्हणणें आहे.

**हुबळी-धारवाडचा विकास**—हुबळी-धारवाड कॉर्पोरेशननें ह्या दोन शहरांचा विकास साधण्यासाठीं एक पंचवार्षिक योजना तयार केली आहे. ह्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत विकासाच्या कामावर ४४० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. भूमिगत गटारें, रस्ते आणि पाणीपुरवठा ह्या बाबींना कार्यक्रमांत प्राधान्य देण्यांत आलें आहे.




महाराष्ट्र बँकेंत खातें उघडायला अवघे रु. ५ पुरतात
खातें उघडल्यावर अगदीं रु. १ इतकी छोटी रक्कमसुद्धां आपणांस
आपल्या खात्यावर जमा करतां येते व त्यामुळें बचतीची
संवय लागते. महाराष्ट्र बँकेंत पैसे सुरक्षित राहून त्यावर आकर्षक
व्याजहि मिळतें. आपल्याला खातें उघडावयास
महाराष्ट्र बँकेचे शाखाधिकारी नेहमींच आनंदानें मदत करितात. खातें
उघडल्यावर पास बुक व चेक बुक मिळत असल्यानें
प्रत्येक व्यवहाराची नोंद आपल्याजवळ राहते. महाराष्ट्र बँकेच्या
इतरहि सोयींसाठीं एकदां जवळच्या शाखेंत जरूर या.

Pratibha · 62 · 8

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड**

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें-२

## बँकांच्या कामाचे तास

ग्रेट ब्रिटनमधील बँकांच्या कामाचे तास वाढविण्याविषयीं विचार चालू आहे. खालील तक्त्यांत युरोपांतील कामाच्या तासांचे तुलनात्मक आंकडे दिले आहेत.

| | उघडण्याची वेळ | मधली सुटी तास | बंद होण्याची वेळ | शनिवार | सार्वजनिक सुट्ट्या | वर्षांतील एकूण तास काम |
|---|---|---|---|---|---|---|
| आम्स्टरडॅम | ९·०० | २ | ३·३० | बंद | ८ दिवस | १,१३४ |
| ब्रुसेल्स | ९·०० | १½ | ३·३० | ,, | ९ ,, | १,२६५ |
| फ्रँकफूर्ट | ८·३० | १½ | ४·०० | ,, | १४ ,, | १,५७७ |
| मिलन | ८·३० | २¼ | ४·०० | ,, | १२ ,, | १,३०२ |
| पॅरिस | ९·०० | २ | ४·०० | ,, | १२ ,, | १,२४० |
| सरासरी | ८·५० | बंद | ३·४५ | बंद | ११ ,, | १,३०४ |
| लंडन | १०·०० | मधें सुटी नाहीं | ३·०० | ९ ते ११·३० | ६ ,, | १,४०० |

### गोव्यांतील उद्योगधंद्यांना मदत

गोव्यांतील उद्योगधंद्यांचा विकास करण्यासाठी आर्थिक मदत देण्याच्या शक्यतेचा विचार चालू आहे, अशी माहिती स्टेट बँक ऑफ इंडिआचे अध्यक्ष श्री. वेंकटप्पा ह्यांनीं सांगितली आहे. त्यांनीं गोव्याचा तीन दिवसांचा दौरा केला. दौऱ्याच्या काळांत त्यांनीं खाणमालक, निर्यात व्यापारी, धंदेवाले, इत्यादि अनेक लोकांच्या भेटी घेतल्या. गोवा चेंबर ऑफ कॉमर्सच्या प्रतिनिधीं-चीहि त्यांनीं गाठ घेतली. गोव्यांतील छोट्या उद्योगधंद्यांच्या मालकांनीं व खाणीच्या मालकांनीं त्यांच्याबरोबर आर्थिक मदती-संबंधीं वाटाघाटी केल्या. गोव्यांतील अनेक छोट्या उद्योगधंद्याच्या मालकांनीं नवे उद्योगधंदे स्थापन करण्याची इच्छा दाखविली आहे. आपल्या नवीन उपक्रमांसाठी स्टेट बँकेकडून मदत मिळ-विण्याची खटपट त्यांच्याकडून चालू आहे.

### राजकीय कारणांसाठी देण्यांत येणारें पेन्शन

राजकीय कारणांसाठी पेन्शन देण्यांत येत असलेल्या लोकांची भारतामधील संख्या ५,५०० आहे. त्या सर्वांना मिळून दरसाल २५ लाख रुपये द्यावे लागतात. त्यांत राजघराण्यांतील कुटुंबांचे वंशज व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती ह्यांची संख्या सर्वांत मोठी आहे. ब्रिटिश राजवट भारतांत पसरूं लागल्यावर अनेक कुटुंबांचीं निर्वाहाचीं साधनें काढून घेण्यांत आलीं. त्यांनाहि पेन्शन देण्यांत येतें. दरमहा १०० रुपयांपेक्षा अधिक पेन्शन मिळणाऱ्यांची संख्या ३०० पेक्षा कमी आहे. पेन्शन देण्याबाबत सामान्यपणें असा नियम आहे कीं असें पेन्शन ज्या व्यक्तींना देण्यांत येतें त्यांच्या हयातींत तें बंद करण्यांत येत नाहीं. ज्या लोकांच्या पूर्वजांनीं १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेतला होता अशा कांहीं लोकांना मध्यवर्ती सरकारकडून योग-क्षेमासाठी भत्ता मिळतो.

### एंजिनिअरिंग कॉलेजमधील राखीव जागा

सुरत येथील सरदार वल्लभभाई पटेल रिजनल एंजिनिअरिंग कॉलेजांत महाराष्ट्रांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ११ जागा राखून ठेवण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणें भोपाळ येथील मौलाना आझाद कॉलेज ऑफ टेक्नॉलजी ह्या संस्थेंत ५० जागा राखून ठेवण्यांत आल्या आहेत. कॉलेजांमधील शिक्षणक्रम १९६२–६३ च्या जून-जुलैमध्यें सुरू होईल.

### बद्रिनाथ मंदिराच्या यात्रेचा हंगाम

हिमालयांतील बद्रिनाथ मंदिराच्या यात्रेचा हंगाम आतां सुरू झाला आहे. यात्रेचा रस्ता खुला झाल्याच्या प्रसंगीं वेदांचा घोष करण्यांत येत होता. ह्या समारंभांत ६,००० यात्रेकरूंनीं भाग घेतला. बद्रीनाथ मंदिर समुद्रसपाटीपासून १०,५०० फूट उंचीवर आहे. मंदिराच्या परिसरांत अद्यापीहि बर्फ सांचून राहिलेलें असलें तरी तेथपर्यंत जाण्याचा मार्ग हळूहळू मोकळा होत आहे. आतांपर्यंत हृषीकेशपासून बद्रीनाथ येथें जाण्यासाठी ८,००० यात्रेकरूंनीं प्रस्थान ठेवलें आहे. केदारनाथाची यात्रा करून ४०० प्रवासी नुकतेच परतले आहेत. त्यांनीं दिलेल्या माहितीवरून बद्रिनाथपासून रुद्रप्रयागपर्यंत जाण्याची कांहीं सोय करण्यांत आलेली नाहीं. यात्रेकरूंची वाहतूक करण्यास पुरेशा मोटारगाड्या नाहींत. त्यामुळें त्यांची कुचंबणा होत आहे.

### भारतामधील कॅमेऱ्यांची अमेरिकेला निर्यात

भारतामध्यें तयार करण्यांत आलेल्या कॅमेऱ्यांची निर्यात अमेरिकेला करण्यांत येत आहे. १९६२–६३ सालांत ५०,००० कॅमेऱ्यांची निर्यात करण्यांत येणार आहे. त्यांपैकी पहिला हप्ता घेऊन एक बोट नुकतीच अमेरिकेला रवाना झाली. ह्या निर्यातीमुळें भारताला परदेशीय चलनाच्या स्वरूपांत ३,७५,००० रुपयांची प्राप्ति होईल. मध्यपूर्व व अतिपूर्व ह्या भागांतील देशांतहि १०,००० कॅमेऱ्यांची निर्यात करण्यांत येणार आहे. मुंबईमधील एका कारखान्यांत ते तयार करण्यांत येत असून त्यामधील २५ टक्के भाग परदेशीय बनावटीचे आहेत. १९६१–६२सालीं एकूण २५,००० कॅमेऱ्यांचें उत्पादन करण्यांत आलें १९६२–६३ सालीं १,५०,००० कॅमेरे तयार करण्यांत येतील असा उत्पादकांचा अंदाज आहे. कॅमेऱ्यांना लागणाऱ्या काचाहि देशांतच तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**सहकारी घरबांधणीमधील अडचणी**—सांगलीमधील सहकारी घरबांधणी संस्थांना जागा मिळण्याच्या बाबतींत अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. अशा २० सहकारी संस्थांच्या कार्यकर्त्यांच्या सभेंत आपलें गाऱ्हाणें मुख्य मंत्र्यांच्यापर्यंत पोंचविण्याचें ठरलें. ह्या संस्थाच्या सभासदांची संख्या सुमारें १,००० असून घरबांधणीसाठी जागा मिळविण्याच्या कामीं त्यांना कायदेशीर अडचणींचा अडथळा होत आहे.

### अवजड लष्करी वहानांचा कारखाना

लष्करला लागणाऱ्या अवजड लष्करी वाहनांचें उत्पादन करण्यासाठी भारत सरकारनें मद्रास राज्यांत आवडी ह्या ठिकाणीं एक कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्याच्या प्रत्यक्ष उभारणीस लवकरच प्रारंभ होईल. कारखान्यासाठी लागणारी ७७० एकर जागा मद्रास सरकारनें मिळवून दिली आहे. कारखाना उभा राहून त्यांत उत्पादन सुरू झालें म्हणजे सुमारें २,५०० ते ३,००० कामगारांना रोजगार मिळेल. भारताच्या लष्कराला लागणारी अनेक प्रकारची यंत्रसामग्री व उपकरणेंहि कारखान्यांत तयार होऊं शकतील. प्रारंभीं कारखान्याला लागणारी कांहीं यंत्रसामग्री सरकारच्या इतर लष्करी कारखान्यांतून घेण्यांत येईल. पण अखेरीस कारखाना स्वयंपूर्ण होईल.

### अमेरिकेकडे कापसाची मागणी

भारताचे अमेरिकेंतील वकील श्री. बी. के. नेहरू ह्यांनीं अमेरिकेच्या शेतकीखात्याकडे ६ लाख गासडया कापसाची मागणी केली आहे. ह्या कापसाची भारताला अतिशय गरज असून तो जितक्या लवकर मिळेल तितक्या लवकर पाहिजे आहे असेंहि आवर्जून सांगण्यांत आलें आहे. भारताच्या मागणीचा अमेरिका गंभीरपणें विचार करील असें सांगण्यांत येत आहे. अमेरिकेच्या शेतकीव्यापार विकास कार्यक्रमाला अनुसरून कापसाची मागणी करण्यांत आली असून त्याची किंमत सुमारें १० कोटी डॉलर्स होईल. रुपयाच्या चलनांत ती ५० कोटी रुपये होईल.

### मच्छीमारीच्या धंद्याचा विकास

ओरिसा राज्य सरकारनें रशियाच्या मदतीनें मच्छीमारीच्या धंद्याचा विकास करण्याचें ठरविलें आहे. हा धंदा चालविण्यासाठी राज्यसरकार एका कॉर्पोरेशनची स्थापना करणार आहे. खोल समुद्रांत जाऊन मासे पकडतां यावेत म्हणून आधुनिक साधनांचा वापर करण्यांत येणार आहे. धंद्याला उपयुक्त अशा प्रकारच्या बोटी रशिआ पुरविणार आहे. मासे पकडून डबाबंद व टिकाऊ करण्याची यंत्रसामग्री ह्या बोटींवर मुद्दाम बसविण्यांत येणार आहे. त्यामुळें माशांची निर्यात करणें सुलभ होईल.

### उसाची किंमत आणि साखरेचा उतारा

साखरेच्या कारखान्यांतून गाळण्यांत येणारा ऊस आणि त्याचा साखरेचा उतारा ह्या गोष्टी लक्षांत घेऊन उसाची किंमत ठरविण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. मात्र साखरेचा उतारा ९ टक्यांपेक्षा कमी पडला तरच ही सांगड घालण्यांत येणार आहे. ९ टक्के उताऱ्यापेक्षा कमी उतारा पडूं लागल्यास ९ टक्क्यांनंतरच्या प्रत्येक टक्का कमी उताऱ्यास उसाच्या दरमणामागें १·५ नया पैसा कमी किंमत देण्यांत येईल. ही सवलत सर्व भारताला लागूं करण्यांत आली असून ती १ मे पासून अमलांत आली आहे. शेतकऱ्यांचा सर्व ऊंस गाळणें कारखान्यांना शक्य व्हावें म्हणून हा उपक्रम करण्यांत आला आहे.

### तंजावर जिल्ह्यांतील दलदलीचा उपयोग

तंजावर जिल्ह्यांत वेदारण्यम् ह्या नांवाचा एक दलदलीचा भूभाग आहे. त्याची लांबी २८ मैल असून रुंदी सुमारें ५ ते ६ मैल आहे. ह्या दलदलीपासून उद्योगधंद्यांना लागणारे क्षार निर्माण करतां येतील असें मत एका फ्रेंच तज्ज्ञानें व्यक्त केलें आहे. हा तज्ज्ञ जयपूर येथील हिंदुस्थान सॉल्टस लि. ह्या सार्वजनिक मालकीच्या कंपनीच्या आमंत्रणावरून पहाणी करण्यासाठी आला होता. वेदारण्यम् दलदलीचा हा उपयोग भारत सरकारनें १९४८ सालीं नेमलेल्या एका कमिटीनें दाखवून दिलेला आहे.

### कोळशाच्या किंमतींत वाढ होणें अपरिहार्य

नॅशनल कोल-डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. आर. सी. दत्त ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, दगडी कोळशाच्या किंमतींत वाढ होणें ही गोष्ट अपरिहार्य आहे. ह्यासंबंधीं बोलतांना ते पुढें म्हणाले कीं, कोळशाच्या खाणी चालविण्याचें काम अधिकाधिक तांत्रिक होत चाललें आहे. खोलवर असणाऱ्या कोळशाच्या खाणींतून उत्पादन करावयाचें असल्यास कोळशाच्या किंमतींत वाढ करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. कोळशाच्या सध्यांच्या किंमती लक्षांत घेतल्यास खोल खाणी चालवितां येणार नाहींत हें उघड आहे. खाजगी मालकीच्या कोळसा खाणी-मालकांनीं किंमतींत वाढ करून देण्याची मागणी ह्यापूर्वीच केली आहे. सार्वजनिक मालकीच्या कोळसा खाणींनाहि हाच मार्ग पुढेंमागें अनुसरावा लागेल. हा फक्त काळाचा प्रश्न आहे.

### अरुंद रुळाच्या रेल्वेमार्गासाठी फिरती यारी

अरुंद रुळाच्या रेल्वेमार्गासाठी उपयोगांत आणण्यासाठी एक फिरती यारी इझतनगर येथील वर्कशॉपमध्यें तयार करण्यांत आली आहे. तिचें वजन १० टन असून भारतांत तयार करण्यांत आलेली अशा प्रकारची ती पाहिलीच यारी आहे. ह्या याऱ्या आतांपर्यंत परदेशांतून मागवाव्या लागत असत. परंतु त्यांचें उत्पादन देशांतच होऊं लागल्यास दरसाल ७५ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होऊं शकेल. अशा प्रकारच्या याऱ्या रेल्वेमार्गावरील कांहीं दुरुस्त्या करण्याच्या कामीं फार उपयुक्त असतात. रुंद रुळाच्या रेल्वेरस्त्याच्या उपयोगासाठी वापरावयाच्या फिरत्या याऱ्या देशांतच तयार करण्यांत येतात. त्या बनविण्याचें काम जमालपूर येथील रेल्वेच्या कारखान्यांत करण्यांत येतें.

### १८५७ च्या वीरांच्या स्मारकाबद्दल अनास्था

जबलपूर-दामोह रस्त्यावर जबलपूरपासून २० मैलांवर १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धांत पडलेल्या हिंदी सैनिकांच्या स्मृत्यर्थ एक चबुतरा बांधण्यांत आला होता. मध्यप्रदेशाचे सध्यांचे मुख्य मंत्री श्री. मंडलोई ह्यांनीं स्मारकाचा पायाभरणी समारंभ केला होता. ह्या ठिकाणीं १०० वर्षांपूर्वी ब्रिटिश लष्कर व 'बंडवाले' ह्यांच्यांत निकराची लढाई झाली होती. स्मारक बांधलें गेलें त्या वेळीं स्मारक पवित्र राखण्याचें ठरलें होतें. परंतु आतां सदर स्मारकाची देखभालहि करण्यांत येत नाहीं.

### आंध्र प्रदेशामधील विजेचा तुटवडा

आंध्र प्रदेशांत सध्यां विजेचा पुरवठा अपुरा पडत असल्यानें त्याचा उद्योगधंद्यावर परिणाम होत आहे. राज्य सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे ४ टर्बाइन्स विकत घेण्यासाठी परदेशीय चलनाची मागणी केली आहे. प्रत्येक टर्बाइनच्या साह्यानें २५,००० किलोवॅट वीज तयार होणार आहे. सर्व टर्बाइन्सची मिळून किंमत सुमारें १ कोटी रुपये होईल. अशा प्रकारचीं टर्बाइन्स मिळूं शकलीं नाहींत तर ११,००० किलोवॅटचीं दोन टर्बाइन्स विकत घेण्यासाठी तरी परदेशीय चलन मंजूर करण्याची विनंती राज्यसरकारतर्फे करण्यांत आली आहे. हीं टर्बाइन्स अमेरिकेंत ताबडतोब मिळूं शकतील अशी आंध्र सरकारची माहिती आहे.

### फोर्ड मोटार कंपनीच्या नफ्यांत घट

ब्रिटनमधील अमेरिकन मालकीच्या फोर्ड मोटार कंपनीच्या नफ्यांत घट होत चालली आहे. गेल्या वर्षी कंपनीच्या नफ्यांत ११,५०,००० पौंड घट झाल्याचें आढळून आलें आणि चालू सालाच्या पहिल्या तीन महिन्यांत ह्या घटीचा वेग अधिकच वाढत आहे. गेल्या वर्षी कंपनीची विक्री २५,९०,००,००० पौंडांची झाली. त्याच्या मागील वर्षी ती २६,८०,००,००० पौंड झाली होती. कराची आकारणी होण्यापूर्वीचे नफ्याचे आंकडे अनुक्रमें २२, २००,००० आणि ३३,७००,००० पौंड असे आहेत. अमेरिकेला निर्यात करण्यांत येणाऱ्या गाड्यांत घट झाल्यामुळें निर्यातीचा आंकडाहि बराच खाली आला. अमेरिकेनें छोट्या पण सोयिस्कर गाड्या काढल्यानें ब्रिटनमधील फोर्ड कंपनीच्या विक्रीवर व नफ्यावर परिणाम झालेला आहे.

### रशियांतील लोकांना अधिक सवलती

रशियांतील लोकांना उन्हाळ्यांत चार दिवस मजेंत घालविता यावेत म्हणून सरकारनें चांगल्या हवेच्या ठिकाणीं विश्रांतिस्थानें व वसतिगृहें बांधलेलीं आहेत; परंतु ह्या ठिकाणीं जातांना मुलांना बरोबर घेऊन जातां येत नसे. आतां मात्र कोणालाहि आपल्या बायकामुलांसह ह्या ठिकाणीं जाऊन राहतां येईल. अगदीं लहान मुलें असलीं तरीसुद्धां त्यांना ह्या सवलतीचा फायदा घेतां येईल. रशियांत क्रांति झाल्यापासून ही सवलत प्रथमच देण्यांत येत आहे. सुमारें ५० लाख रशियन नागरिकांना सरकारी आरोग्यधामांचा फायदा घेतां येण्याची सोय करण्यांत आली आहे. रशियाची लोकसंख्या २२ कोटी आहे. अधिक लोकांची सोय करण्यासाठी प्रासादतुल्य इमारती बांधण्यांत येणार आहेत.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१९००

बचतीच्या आकर्षक योजना

( १ ) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर २॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत — „ ३॥ „
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — „ ५ „

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर




**बेडेकर**
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखा : ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ **सरदारगृह** ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ **माकडछाप** म्हणजेच **काळी टूथ पावडर** ★


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.